## महाराष्ट्र शासन

क्रमांक: माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८
नियोजन विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १९ जुलै, २०११.

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद
३. जिल्हाधिकारी (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय (सर्व)
६. संचालक (आरोग्य), आरोग्य संचालनालय, मुंबई
७. संचालक (शिक्षण), शिक्षण संचालनालय, पुणे
८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
९. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर
१०.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई
११.प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (सर्व)
१२.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**विषय :- मानव विकास कार्यक्रम - सन २०११-१२**
**कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या योजनांच्या अंमलबजावणी संबंधात काही महत्वाच्या सूचना आणि अंमलबजावणी वेळापत्रक.**

महोदय,

सन २००६ पासून राज्यातील सर्वात कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या १२ जिल्हयातील २५ तालुक्यांत प्रामुख्याने लोकांच्या शिक्षण, आरोग्य, उत्पन्न वाढ यांत सुधारणा करण्यासाठी एकात्मिक प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातून मानव विकास कार्यक्रम राबविला जात होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य शासनाकडून गेल्या ४ वर्षात रु.२३५ कोटी खर्च करण्यात आले असून या कार्यक्रमाचे चांगले परिणात दिसून आले आहेत. मानव विकास कार्यक्रमाचे चांगले परिणाम लक्षात घेऊन मानव विकास ही संकल्पना "जिल्हया" ऐवजी "तालुका" स्तरावर राबवून कार्यक्रमाची ही व्याप्ती राज्यातील सुमारे १२५ तालुक्यांमध्ये राबविण्याबाबत शासनाने शासन निर्णय, नियोजन विभाग, दिनांक १९ जुलै, २०११ अन्वये निर्णय घेतलेला आहे. (सुलभ संदर्भासाठी शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे).

२.	मानव विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या सर्व योजनांची अंमलबजावणी ३१ मार्च, २०१२ पूर्वी पूर्ण करण्याच्यादृष्टीने सोबत जोडलेल्या वेळापत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे सविस्तर सूचना जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर काम करणाऱ्या सर्व कार्यकारी यंत्रणा आणि पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांना देण्यात येत आहेत -

१. इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावी चे निकाल जाहीर झालेले आहेत. त्यामुळे इयत्ता दहावी आणि बारावी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष कोचिंग वर्ग सुरु करणेबाबतच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी तातडीने सुरु करणे अत्यावश्यक आहे. या विशेष कोचिंग कार्यक्रमाचा कालावधी तीन महिन्याचा आहे. बोर्डाची पुरवणी परीक्षा सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विशेष कोचिंग क्लासेस बाबतच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी कोणत्याही परिस्थितीत **<u>३० जुलै, २०११ पूर्वी</u>** सुरु करणे आवश्यक आहे.

२. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील प्रवेश प्रक्रिया जवळ जवळ पूर्ण झालेली आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत बससेवा सुरु केल्याने त्याचा फायदा किती प्रमाणात होईल या संबंधात तातडीने विचार केला जावा. या वर्षी बससेवा सुरु करावयाची असेल तर ज्या मुलींनी माध्यमिक वा उच्च माध्यमिक शाळांमध्ये प्रवेश घेतलेला नाही अशा किती मुलींची नोंदणी केली जावू शकेल याचाही अंदाज घेणे गरजेचे आहे. अशा मुलींची यादी करुन त्यांना प्रवेश घेण्याकरिता प्रवृत्त करावे लागेल. यासंबंधात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांशी विचार विनिमय करुन निश्चित स्वरुपाचा कृति आराखडा तयार करुन त्याची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक राहील. बससेवा सुरु केल्यानंतरही अधिकच्या मुलींची पट नोंदणी झाली नाही तर करण्यात आलेला खर्च व्यर्थ गेला असा निष्कर्ष काढला जावू शकेल. त्यामुळे निवड करण्यात आलेल्या सर्व तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची तसेच व्यवस्थापक मंडळाच्या पदाधिका-यांची बैठक घेवून या कार्यक्रमाची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल यासंबंधात सविस्तर विचारविनिमय करण्यात यावा.

३. प्रत्येक तालुक्यामधून साधारणत: १० ठिकाणी अभ्यासिका सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. या अभ्यासिका शक्यतो माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये सुरु केल्या जाव्यात. सर्वच शाळांमध्ये अभ्यासिका सुरु करणे शक्य नसल्यास, काही महत्वाच्या शाळांची निवड तातडीने पूर्ण करण्यात यावी. याबाबत सुध्दा संबंधित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची तसेच व्यवस्थापक मंडळाच्या पदाधिका-यांची बैठक घेवून सविस्तर कार्यक्रम आखण्यात यावा. अभ्यासिका चालू

करण्याकरिता व्यवस्थापक आणि सेवक यांच्या नियुक्त्या तातडीने करण्यात याव्यात. या कार्यक्रमाकरिता पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. संपूर्ण तरतूद याच आर्थिक वर्षात खर्ची पडणे आवश्यक आहे.

४. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बाल भवन-विज्ञान भवन सुरु करण्याची योजना या वर्षीच्या मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे. विज्ञान केंद्र सुरु करतांना नवीन इमारत बांधणे अपेक्षित नाही. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या इमारतींचाच उपयोग करण्यात यावा. या योजनेकरिता उपलब्ध करण्यात आलेला निधी हा प्रामुख्याने वेगवेगळया प्रकारचे वैज्ञानिक साहित्य खरेदी करण्याकरिता करण्यात आलेला आहे. या विज्ञान केंद्राच्या दैनंदिन व्यवस्थापणाची जबाबदारी खाजगी उच्च माध्यमिक शाळाकडे देणे अपेक्षित आहे. संबंधित खाजगी शाळा काही माफक प्रमाणात प्रवेश शुल्क आकारु शकेल. या संबंधातसुध्दा जिल्हाधिका-यांनी दर्जेदार उच्च माध्यमिक शाळेची निवड करुन कार्यक्रमाचा आराखडा तयार करावा. तसेच याबाबत शासनाकडून काही आदेश आवश्यक असल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव सुध्दा विनाविलंब शासनास पाठविण्यात यावा. सुरु करण्यात आलेले विज्ञान केंद्र हे दर्जेदार आणि शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल अशा दृष्टीने तयार करण्यात यावे. याकरिता तज्ज्ञ शिक्षकांची एक समिती गठीत करण्यात यावी आणि त्यांच्या सूचना विचारात घेवून, सर्व प्रकारचे वैज्ञानिक आणि शैक्षणिक साहित्याची खरेदी करण्यात यावी. या संपूर्ण योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता कमीत कमी ६ ते ७ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी कोणत्याही परिस्थितीत **३१ मार्च, २०१२ पूर्वी** पूर्णतः खर्च करावयाचा आहे. ही बाब विचारात घेता, सदर योजनेच्या अंमलबजावणीकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही टप्प्यावर दिरंगाई झाल्यास, योजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी ३१ मार्च, २०१२ पूर्वी खर्ची पडणार नाही.

५. फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरु करण्याबाबतची योजना मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे. ही योजना कृषि विज्ञान केंद्राचे माध्यमातून राबविणे अपेक्षित आहे. अर्थात, राज्य शासनाचा कृषि विभाग ही जबाबदारी स्विकारण्यास तयार असेल तर त्याचाही विचार करणे संयुक्तिक ठरेल. महत्वाचे म्हणजे या योजनेच्या अंमलबजावणीकरिता फक्त भांडवली खर्च मानव विकास कार्यक्रमाच्या निधीतून केला जाणार आहे. रिकरिंग (आवर्ती) खर्च संबंधित यंत्रणेने करावयाचा आहे. याकरिता संबंधित यंत्रणा शासनाच्या नियमानुसार फी ची आकारणी करु शकेल. फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरु करण्याकरिता सर्व प्रथम वाहनाचे डिझाईन कसे असावे याबाबत निर्णय घ्यावा लागेल. त्या नंतर निविदा पध्दतीचा अवलंब करुन वाहनाची खरेदी करावी लागेल. वाहने उपलब्ध

होण्याकरिता आणि त्या वाहनामध्ये सर्व प्रकारचे माती परिक्षण साहित्य बसविण्याकरिता ३ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही प्रयोगशाळा साधारणपणे ऑक्टोंबर महिन्यात सुरु होईल या दृष्टीने संपूर्ण आराखडा तयार करण्यात यावा. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून दररोज किती नमुने (सॅम्पल्स) तपासले जातील याचेही मापदंड तयार करण्यात यावेत. याकरिता कृषि विभागातील तज्ज्ञ व्यक्तींचा तसेच कृषि विज्ञान केंद्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेण्यात यावा.

६. मानव विकास कार्यक्रमांतर्गत उर्वरित सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी यासोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच करण्यात यावी.

७. मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट सर्वच योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ३० सप्टेंबर २०११ पर्यंत सुरु होईल यादृष्टीने पूर्वतयारी आणि नियोजन करण्यात यावे.

८. सन २०११-१२ च्या मानव विकासाच्या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या योजनांचे अंमलबजावणीचा काय परिणाम झाला, याबाबतचे सविस्तर मुल्यमापन मानव विकास आयुक्तालयाकडून करण्यात येणार आहे. त्याकरिता राज्यातील काही तालुक्यांची रॅन्डम पध्दतीने निवड केली जाईल. एप्रिल ते जून २०१२ या तीन महिन्याच्या कालावधीत मुल्यमापनाचे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यादृष्टीने सुरुवातीपासूनच नियोजनबध्द पध्दतीने सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात यावी.

९. वेगवेगळया योजनांच्या अंमलबजावणीमध्ये किती लाभार्थी आणि त्यांना कशा प्रकारचा फायदा झाला, याबाबतचा आढावा दरमहा नियमितपणे घेण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत योजनेमधील खर्च व्यर्थ जाणार नाही याची दक्षता सर्व संबंधित यंत्रणेच्या अधिका-यांनी घ्यावी.

१०. मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या योजनांवर केला जाणारा खर्च हा शासनाने निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि मापदंडानुसारच करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत, शासनाने निर्धारित केलेल्या कार्यप्रणालीचे उल्लंघन होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी आणि त्यादृष्टीने तशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यकारी यंत्रणांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

११. योजनेच्या अंमलबजावणीवर करण्यात आलेल्या खर्चाची सविस्तर तपशिलवार माहिती तालुकानिहाय आणि योजनानिहाय विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. ती माहिती दरमहा नियमितपणे अद्यावत करण्यात यावी.

१२. या कार्यक्रमाची माहिती तालुक्यातील सर्व लोकांना व्हावी, या उद्देशाने सदर कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच तालुक्याच्या काही महत्वाच्या ठिकाणी दर्शनी भागात सूचना फलक लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे सर्व योजनांची तपशीलवार माहिती तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतींना तसेच लोकप्रतिनिधींनादेखिल कळविण्यात यावी.

१३. मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट सर्व योजनांची अंमलबजावणी वेळापत्रकानुसार होण्याकरिता दरमहा बैठका घेवून, त्यामध्ये योजनांचे अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. सोबत जोडलेल्या विहित नमून्यातील मासिक प्रगती अहवाल दरमहा १० तारखेच्या आत न चूकता मानव विकास आयुक्तलयास फॅक्सद्वारे/ई-मेल द्वारे पाठविण्यात यावा. सदर अहवालात नमूद करण्यात आलेली माहिती परिपूर्ण आणि बिनचूक असावी. मानव विकास आयुक्तालयाचा पत्ता खालील प्रमाणे आहेः-

१४. आयुक्त,
मानव विकास आयुक्तालय,
विकास भवन, पहिला मजला,
अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपा जवळ, औरंगाबाद - ४३१००१
दुरध्वनी क्र. (०२०४) २३५६११२ फॅक्स - २३५६११३
ई-मेल - hdimission@yahoo.co.in

१५. ज्या कार्यकारी यंत्रणेचे कामकाज समाधानकारक नसेल त्या यंत्रणेबाबतचा सविस्तर अहवाल तातडीने मंत्रालयीन संबंधित विभागाच्या सचिवांकडे पाठविण्यात यावा, तसेच त्याची एक प्रत आयुक्त, मानव विकास आणि प्रधान सचिव (नियोजन) यांचेकडेसुध्दा पाठविण्यात यावी.

१६. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या सर्व योजनांच्या कामांना नियमितपणे भेटी देवून योजनेच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन करण्यात यावे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांमार्फत योजनेच्या कामाला भेटी दिल्या जाव्यात. योजनांचे अंमलबजावणीत काही उणीवा आढळून आल्यास, त्या तातडीने दूर करण्याबाबतच्या सूचना संबंधित कार्यकारी यंत्रणेला दिल्या जाव्यात.

१७. जिल्हाधिका-यांनी एप्रिल-मे २०१२ मध्ये या कार्यक्रमाचे अंमलबजावणीबाबतचा सविस्तर प्रशासकीय अहवाल तयार करावयाचा आहे. प्रशासकीय अहवालामध्ये या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात आली आणि कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात आलेल्या वेगवेगळया योजनांचा फायदा किती लाभार्थ्यांना झाला, फायद्यांचे स्वरुप, याबाबतची सविस्तर माहिती अहवालात समाविष्ट करावयाची आहे. प्रशासकीय अहवाल परिपूर्ण आणि मार्गदर्शक स्वरुपाचा होण्याकरिता सुरुवातीपासूनच त्याबाबत तयारी करण्यात यावी. प्रशासकीय अहवालात संख्यात्मक आणि गुणात्मक माहिती समाविष्ट

करावी. वेगवेगळया योजनांच्या अंमलबजावणीबाबत काही चांगले फोटोग्राफ सुध्दा अहवालात समाविष्ट करण्यात यावेत. जिल्हयांनी तयार केलेल्या प्रशासकीय अहवालाच्या आधारे, मानव विकास आयुक्तालयाने प्रशासकीय अहवाल तयार करुन शासनास सादर करावा. जिल्हयांनी तयार केलेला प्रशासकीय अहवाल परिपूर्ण आणि योग्य प्रकारे तयार केला नसेल तर मानव विकास आयुक्तालयास चांगला आणि दर्जेदार अहवाल तयार करणे शक्य होणार नाही, त्यादृष्टीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने विषयाची दखल घ्यावी.

१८. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात निवडण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये पुढील आर्थिम वर्षात बदल होण्याची शक्यता विचारात घेता, तालुक्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला संपूर्ण निधी कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्च,२०१२ पूर्वी खर्ची टाकण्यात यावा. उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी खर्ची पडला नाही आणि त्यामुळे काही कामे अपूर्ण अवस्थेत राहिल्यास, १ एप्रिल, २०१२ नंतर त्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता राहील.

१९. एखाद्या योजनेकरिता प्रस्तावित करण्यात आलेला निधी पूर्णतः खर्च होण्याची शक्यता नसेल तर, शिल्लक निधी इतर योजनांवर खर्च करणेबाबतचा प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत **३१ डिसेंबर, २०११ पूर्वी** शासनास पाठविण्यात यावा आणि शासनाची मंजूरी घेतल्यानंतरच शिल्लक निधी इतर योजनांवर खर्च करण्यात यावा.

२०. एखाद्या योजनेवरील खर्चाचे मापदंडात बदल करणे आवश्यक वाटत असेल तर, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव ३१ ऑक्टोबर, २०११ पूर्वी शासनास पाठविण्यात यावा.

२१. मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या वेगवेगळया योजनांच्या अंमलबजावणीकरिता रु.३.०० लक्ष पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सद्यःस्थितीत राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यक्रमाअंतर्गत अशा प्रकारचे अधिकार गट विकास अधिकाऱ्यांना नाहीत. एक "विशेष बाब" म्हणून मानव विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी गतिमान पध्दतीने करण्याकरिता हे अधिकार गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. गटविकास अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे प्रशासकीय मंजूरी देण्यापूर्वी सर्व बाबींची सखोल तपासणी करणे अत्यावश्यक आहे. ही बाब विचारात घेता, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रशासकीय मंजूरी देण्यापूर्वी घ्यावयाच्या काळजी संबंधात सविस्तर सूचना देण्यात याव्यात, जेणेकरुन त्यांच्याकडून गंभीर स्वरुपाची वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार, आयुक्त, मानव विकास यांनी याबाबत सर्व गट विकास अधिकाऱ्यांची स्वतंत्र

कार्यशाळा आयोजित करावी आणि त्यांना तज्ज्ञ अधिकाऱ्यांमार्फत परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात यावे. अशा प्रकारची कार्यशाळा ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयात आयोजित करावी.

२२. योजनेच्या अंमलबजावणीचे तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित खात्याच्या जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेले आहेत. त्यांनी सुध्दा तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी आवश्यक सर्व प्रकारची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. योजनेच्या अंमलबजावणीत तांत्रिक उणीवा राहिल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यकारी यंत्रणेची राहील.

२३. सन २०११-१२ करिता मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट सर्व योजनांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर कृति आराखडा तयार करुन तो १५ ऑगस्ट, २०११ पूर्वी मानव विकास आयुक्तालयास पाठविण्यात यावा. तसेच सदर आराखडयाची एक प्रत प्रधान सचिव (नियोजन) आणि मंत्रालयीन संबधित विभागाच्या सचिवांनासुध्दा पाठविण्यात यावी. हा कृति आराखडा तयार करतांना त्यामध्ये सर्व बाबींचा सविस्तरपणे समावेश करण्यात यावा.

२४. विभागीय आयुक्ताचे पातळीवरुन या कार्यक्रमाचे नियमितपणे संनियंत्रण करणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मासिक बैठकीत मानव विकास कार्यक्रमाचे अंमलबजावणीचा आणि प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (नियोजन) यांचेकडे हा विषय सोपविण्यात येत आहे.

२५. विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मासिक बैठकीचा तपशील आयुक्त, मानव विकास यांना आगाऊ कळवावा. जेणेकरुन, मानव विकास आयुक्तालयातील अधिकारी सदर बैठकीस उपस्थित राहू शकतील.

२६. मानव विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या योजनांचे बाबतीत, संबंधित विभागीय सचिवांनी किंवा राज्यस्तरीय क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घेण्यात यावा.

२७. कार्यक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासोबतच जिल्हाधिका-यांनी तालुक्यांचे Baseline सर्व्हेक्षण करावे. जेणेकरुन, कार्यक्रमांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर कार्यक्रमांमुळे झालेल्या फायद्यांचे मुल्यांकन करता येऊ शकेल. दरवर्षी एप्रिल ते जून या तीन महिन्याचे कालावधीत कार्यक्रमांचे अंमलबजावणीमुळे नागरिकांना झालेल्या फायद्याचे मुल्यांकन करण्यात यावे.

२८. आर्थिक वर्ष संपल्यानंतर कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि त्यामुळे नागरिकांना झालेले प्रत्यक्ष फायदे विचारात घेवून कार्यक्रमात समाविष्ट सर्व तालुक्यांचे Ranking करण्यात येईल. तसेच प्रत्येक महसूल विभागातून एक किंवा दोन तालुक्यांची आणि राज्यातून ३ तालुक्यांची उत्कृष्ट तालुके म्हणून निवड

करुन त्यांचा यथोचित गुणगौरव करण्यात येईल. याबाबतच्या सविस्तर सूचना वेगळयाने निर्गमित करण्यात येत आहेत.

आपला,

( अ. कृ. जगताप )
सह सचिव, नियोजन विभाग

प्रत, माहितीस्तव व आवश्यक त्या पुढील त्वरीत कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१. अपर मुख्य सचिव (आरोग्य), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव
१०. मा. प्रधान सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
११. निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग.

## मासिक प्रगती अहवालाचा विहित नमुना

**महिना:-** **जिल्हा:-** **तालुका:-** **खर्च:- रूपये (लाखात)**

| **अ. क्र.** | **योजनेचे नाव** | **अंमलबजावणी स्थिती** | | | | **आर्थिक स्थिती** | | **झालेल्या खर्चाची स्थिती** | | | **प्रत्यक्ष लाभार्थिंची संख्या** | | | लाभाचे स्वरूप | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेळापत्रका-प्रमाणे अपेक्षित स्थिती | प्रत्यक्ष स्थिती | झालेली दिरंगाई (दिवस) | अपेक्षित एकूण दिरंगाई (दिवस) | प्रशासकीय मान्यता किंमत | वितरित निधी | मागील महिन्या-पर्यंत झालेला खर्च | चालु महिन्यात झालेला खर्च | एकूण खर्च (९+१०) | मागील महिन्या - पर्यंत | चालु महिन्यात | एकूण (१२+१३) | | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** |
| | **I शिक्षण** | | | | | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | |
| | **II आरोग्य व बालकल्याण** | | | | | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| | **III उत्पन्नवाढीच्या योजना** | | | | | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | |

## योजना अंमलबजावणी वेळापत्रक

**I शिक्षण**

| अ. क्र. | मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी | जूलै-२०११ | आगॅस्ट-२०११ | सप्टेंबर-२०११ | आक्टोंबर-२०११ | नोव्हेंबर-२०११ | डिसेबर-२०११ | जानेवारी-२०११ | फेब्रुवारी-२०११ | मार्च-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे | योजनेच्या निकषा प्रमाणे संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देउन प्रत्यक्ष वर्ग सुरू करावेत | शिकवणी वर्गासाठी अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे नियोजन | सप्टेंबर अखेर शिकवणी वर्ग बंद करणे | सप्टेंबर / ऑक्टोबर बोर्डाच्या वेळापत्रका प्रमाणे परिक्षा | – | पुरवणी परिक्षेचा निकाल. प्रत्यक्ष शिकवणी वर्ग सुरू करावेत. | शिकवणी वर्गासाठी अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे नियोजन | फेब्रुवारी अखेर शिकवणी वर्ग बंद करणे | फेब्रुवारी / मार्च बोर्डाच्या वेळापत्रका प्रमाणे परिक्षा. खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| २ | मोठ्या गावातील माध्यमिक शाळेत अभ्यासिका सुरु करणे. सोलार लाईट व फर्निचर / पुस्तके पुरविणे | शाळांची निवड करणे योजनेच्या निकषा प्रमाणे संबंधितांनी योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. व्यवस्थापक व शिपायाची नियुक्ती करणे. | अभ्यासिकेसाठी सोलार लाईट, फर्निचर, (पुस्तके वगळता) इत्यादी साहित्य खरेदीची निविदा प्रसिद्ध करणे | अभ्यासिकेसाठी सोलार लाईट, फर्निचर, (पुस्तके वगळता) इत्यादी साहित्य खरेदीची निविदा अंतिम करून पुरवठा आदेश देणे व सप्टेंबर शेवटा पावेतो प्रत्यक्ष अभ्यासिका सुरू करणे. | अभ्यासिका सूरू . | अभ्यासिका सूरू . | अभ्यासिका सूरू . | अभ्यासिका सूरू . | अभ्यासिका सूरू . | ही योजना जुलै ते मार्च पर्यंत सुरू ठेवावी. खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| ३ | ग्रामींण भागातील सर्वच मुलींना १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता गाव ते शाळा यादरम्यान वाहतूकीची सुविधा उपलब्ध करून देणे. | | १२५ तालुक्यांकरिता खरेदी करावयाच्या शाळा बसेसकरिता आवश्यक असणारी तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रीया शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार राज्य परिवहन महामंडळाकडून केली जाईल. यासाठी लागणा-या निधीची मागणी महामंडळाने शालेय शिक्षण विभागाकडे करावी. तालुकास्तरावर गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या समितीत गटशिक्षण अधिकारी, तालुक्याचा एसटी डेपो मॅनेजर, शाळांचे मुख्याध्यापक असतील. सदर समिती शाळा दुर्गमतेचा विचार करून मार्ग निश्चिती करतील व याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी घेतील. | | | | | | | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| ४ | माध्यमिक / उच्च माध्यमिक शासकीय / अनुदानित शाळांमध्ये प्रयोगशाळांकरिता साहित्य पुरविणे | तज्ञ शिक्षकांची समिती गठीत करून या योजनेस तात्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. | प्रयोगशाळा साहित्य खरेदीची निविदा प्रसिद्ध करणे | साहित्य खरेदीची निविदा अंतिम करून प्रयोगशाळा साहित्य पुरवठा आदेश देणे व प्रत्यक्ष साहित्य पुरवठा, सप्टेंबर शेवटा पावेतो | प्रयोगशाळा सूरू . | प्रयोगशाळा सूरू . | प्रयोगशाळा सूरू . | प्रयोगशाळा सूरू . | प्रयोगशाळा सूरू . | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्ण करून प्रयोगशाळा सुरू करणे. | | | | | | |
| ५ | तालुक्याच्या ठिकाणी बालभवन - विज्ञान केंद्र स्थापन करणे | योग्य ठिकाणाची तसेच इमारतीची निवड करणे. वैज्ञानिक उपकरणांच्या खरेदीसाठी तज्ञ शिक्षकांची समिती गठीत करून योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. | वैज्ञानिक उपकरणांची यादी अंतिम करणे | वैज्ञानिक उपकरणांच्या खरेदीची निविदा प्रसिद्ध करणे. | वैज्ञानिक उपकरणांच्या खरेदीची निविदा अंतिम करणे . | वैज्ञानिक उपकरणांचा पुरवठा करणे. | – | दिनांक २६ जानेवारी रोजी बालभवन-विज्ञान केंद्राचे उद्घाटन करणे. | – | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| ६ | कस्तुरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे | दोन वर्गखोल्यांचे व राहण्यासाठी डॉर्मेट्रीच्या बांधकामास संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे.चार शिक्षक मानधनावर नियुक्त करणे.खोल्या उपलब्ध असल्यास इयत्ता नववी सुरू करणे. | बांधकामांची निविदा प्रसिद्ध करणे. | बांधकामांची निविदा अंतिम करूण कार्यारंभ आदेश देणे . | बांधकामास प्रत्यक्ष सुरूवात करणे. | – | – | – | बांधकाम पूर्ण करणे व इमारतीचे उद्घाटन करणे. | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |

| II | आरोग्य व बालकल्याण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी | जूलै-२०११ | आगॅस्ट-२०११ | सप्टेंबर-२०११ | आक्टोंबर-२०११ | नोव्हेंबर-२०११ | डिसेबर-२०११ | जानेवारी-२०११ | फूब्रुवारी-२०११ | मार्च-२०११ |
| १ | तज्ञ महिला डॉक्टरकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व मातांची तपासणी करणे आणि औषधोपचार करणे. | संबंधितांनी या योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. प्रत्येक तालुक्यासाठी दोन पोर्टेबल सोनोग्राफी मशीन खरेदी साठी निवीदा प्रसिद्ध करणे. योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी प्रत्येक प्रा.आ.केंद्राचे पातळीवर प्रत्येक महिन्यात चार कॅम्प्स आयोजित करणे. | प्रत्येक तालुक्यासाठी दोन पोर्टेबल सोनोग्राफी मशीन खरेदी साठी निवीदा अंतिम करून पुरवठा आदेश देणे. सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून घेणे . योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | योजनेच्या निकषाप्रमाणे अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्यासाठी चार कॅम्प्स घेणे. | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| २ | किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्या बाबत प्रशिक्षण देणे | योजनेच्या निकषा प्रमाणे संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देउन १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावातून प्रेरिकांची व महिला बचत गटांची निवड करणे. | प्रेरिकांचे प्रशिक्षण. प्रशिक्षणासाठी तज्ञ संस्थांची निवड , किशोरी मुलींची निवड ,तालुका स्तरिय प्रशिणाचे सहा महिन्याचे नियोजन करणे. | प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरूवात करणे. | प्रशिक्षण सुरू. | प्रशिक्षण सुरू. | प्रशिक्षण सुरू. | – | – | खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| ३ | अ.जा/अ.ज./दारिद्र्य रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे. | योजनेच्या निकषा प्रमाणे संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे . गरोदर मातेच्या गरोदर पणाचा ९ वा महिना कोणता याची माहिती तयार करणे. | योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे. | – | – | – | – | – | – | योजना सुरू.. खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |

| III उत्पन्नवाढीच्या योजना | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | **मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी** | **जूलै-२०११** | **आॅगस्ट-२०११** | **सप्टेंबर-२०११** | **आक्टोंबर-२०११** | **नोव्हेंबर-२०११** | **डिसेबर-२०११** | **जानेवारी-२०११** | **फूब्रुवारी-२०११** | **मार्च-२०११** |
| १ | रेशीम कोष विकसित करण्याकरिता किटक संगोपन गृह बांधणे | योजनेच्या निकषा प्रमाणे प्रति तालुका २० शेतक-यांची निवड करणे व संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे व बांधकामास सुरूवात करणे. | कीटक संगोपन गृह बांधकामाची प्रगती पाहून अनुदानाचा हप्ता देणे. | कीटक संगोपन गृह बांधकाम पूर्ण करणे.काम पूर्ण झ ाल्यावर अनुदानाचा अंतिम हप्ता देणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. | दरमहा उत्पादित कोषांची माहिती संकलित करणे. खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| २ | फिरती माती परीक्षण प्रयोगशाळा सुरु करणे | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तात्रिक समिती गठीत करून वाहन खरेदीसाठी वाहनाचे डिझ ाईन निश्चित करणे. कार्यकारी यंत्रणा निश्चित करणे. संबंधितांनी तात्रिक व प्रशासकीय मान्यता देणे | प्रयोगशाळे करिता उपकरणे, काच सामान, रसायने,जनरेटर, वाहन इत्यादी साहित्य खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध करणे. | प्रयोगशाळे करिता उपकरणे, काच सामान, रसायने,जनरेटर, वाहन इत्यादी साहित्य खरेदीसाठी निविदा अंतिम करून पुरवठा आदेश देणे. व उपरोक्त सर्व साहित्य उपलब्ध करून वाहनावर बसवून घेणे. | रोज किती माती नमुने तपासली जातील याचे मापदेड तयार करून प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू करणे. . | प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू. | प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू. | प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू. | प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू. | प्रत्यक्ष फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू.. खर्चाचा अंतिम अहवाल व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे | योजनेच्या निकषांप्रमाणे ग्रामिण भागात किंवा नजीकच्या छोट्या शहरामध्ये स्वंयरोजगाराकरिता किंवा रोजगाराकरिता वाव आहे अशा व्यवसायांची निवड करून प्रशिक्षण देण्यासाठी संस्थांची निवड करणे. प्रशिक्षणाच्या स्थळांची निवड करणे. वर्षभर राबविण्याच्या प्रशिक्षणाचा सविस्तर आराखडा तयार करणे. व संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. | व्यवसाय निहाय लाभार्थ्यांची निवड करणे. प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू करणे. | लाभार्थ्यांना द्यावयाच्या हत्यारे व संच याची यादी तयार करून त्याच्या खरेदीची निविदा प्रसिद्ध करणे. निविदाअंतिम करणे. पुरवठा आदेश देणे. पहिल्या बॅचचे प्रशिक्षण पूर्ण करून संच वाटप करणे. | दुस-या बॅचचे प्रशिक्षण सुरू करणे. | प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर संच वाटप करणे. | तिस-या बॅचचे प्रशिक्षण सुरू करणे. | प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर संच वाटप | प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर संच वाटप करणे. | खर्चाचा अंतिम अहवाल तयार करणे व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |
| ४ | स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून परसबाग / किचन गार्डन योजना राबविणे | प्रत्येक तालुक्यातील २५ गावे व प्रत्येक गावातील २५ कुटुंबाची निवड करणे. स्वंयसहाय्यता बचत गटांची निवड करणे. संबंधितांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे. | स्वंयसहाय्यता बचतगटास आवश्यक प्रशिक्षण देणे व प्रत्यक्ष योजना सुरू करणे. | योजना पूर्ण | योजना पूर्ण | योजना पूर्ण | योजना पूर्ण | योजना पूर्ण | योजना पूर्ण | खर्चाचा अंतिम अहवाल तयार करणे व खर्च ताळमेळ पूर्ण करणे. |